
# दुधाळ जनावरांमधील खूरवाढीची समस्या



डॉ. शिल्पा मोडेकर (साळुंके)
(मो.नं. ९४२२२९०५५५)
सहायक प्राध्यापिका,
क्रांतिवीर नानासाहेब पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय,
ता. शिरवळ, जि. सातारा







ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अगदी कमी जागेत, बंदिस्त पशुपालन केले जाते. चालणे न झाल्यामुळे नैसर्गिकरित्या जनावरांची खुरे आपल्या सुनिश्चित आकारमानात राहाणे अपेक्षित असते, त्यांची अवाजवी वाढ होऊन असमतोल निर्माण होत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येते. परिणामी जनावर हळूहळू लंगडण्यास सुरुवात करते. कालांतराने खुरांच्या असमतोल वाढीने जनावरे चालण्या- फिरण्यास असमर्थ बनू लागतात.

**ज**नावरांमध्ये खुरांची वाढ होणे ही एक सततची आणि नैसर्गिक क्रिया आहे. जी जनावरे सतत कामात व्यस्त असतात- अर्थात चालतात, गतिशील असतात त्यांची खुरे ही आपसूकच घासली जात असतात. यामुळे जनावरांच्या पायांची खुरे ही त्यांच्या मर्यादित आणि उचित आकारमानात राहतात. मात्र सद्य:स्थितीत, दिवसागणिक कमी होणारे माळरान, असंतुलित पशुपालन, व्यवस्थापनातील त्रुटी, अशा एक ना विविध कारणांनी जनावरांना मोकळे चरण्यास सोडणे दुरापास्त होत चालले आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात अगदी कमी जागेत, बंदिस्त पशुपालन केले जाते. चालणे न झाल्यामुळे नैसर्गिकरित्या जनावरांची खुरे आपल्या सुनिश्चित आकारमानात राहाणे अपेक्षित असते, त्यांची अवाजवी वाढ होऊन असमतोल निर्माण होत असल्याचे प्रकर्षाने निदर्शनास येते. परिणामी जनावर हळूहळू लंगडण्यास सुरुवात करते. कालांतराने खुरांच्या असमतोल वाढीने जनावरे चालण्या- फिरण्यास असमर्थ बनू लागतात.

**जीवनसत्त्वांची कमतरताही ठरते कारणीभूत**

अशा प्रकारे खुरांच्या समस्या ढोबळमानाने वर नमूद



केल्या. पण काही इतरही कारणे आहेत, ज्याकडे सर्वसाधारणपणे लक्ष दिले जात नाही. किंबहुना ही काही अशी कारणे आहेत की ज्यामुळे खुरांची अतिरिक्त वाढ होईल हे लक्षात पण येत नाही. जसे- जनावरांच्या आहारात योग्य जीवनसत्त्वांची कमतरता. जीवनसत्त्व 'ब'च्या कमतरतेमुळे देखील जनावरांचे खूर असमतोलरित्या वाढीस लागते. त्यातल्या त्यात जीवनसत्त्व बी-१२ दिल्याने जनावरांमधील लंगडेपणा कमी होण्यास मदत होते. खुरांच्या समस्यांपासून आराम मिळतो. तसेच काही वेळा आनुवंशिक कारणांनी देखील, म्हणजे वंशावळीतच खुरांच्या समस्या असतात आणि त्या वंशपरंपरेने पुढील वेतांमध्ये देखील येतात. याचप्रमाणे वाढत्या वयाप्रमाणे खुरांचं असमतोल वाढणं देखील स्वाभाविक आहे. शरीरातील कॅल्शिअमचे प्रमाण असमतोल/ असंतुलित बनते, त्यावेळी देखील खुरे वाजवीपेक्षा जास्त वाढल्याचे दिसून येते. याखेरीज जनावर खूप अशक्त झाले असल्यास देखील हे कारण खुरांच्या असमतोल वाढीस कारणीभूत ठरते. बऱ्याच वेळेस असे देखील दिसून येते की, दलदल- चिखल असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास जात असल्यास आणि पायावर जखमा अथवा काट्यांमुळे चिरा- भेगा पडलेल्या असल्यास अनेक जिवाणूजन्य रोग जनावरांस होण्यास ते कारणीभूत ठरते. अशा वेळी देखील खुरांची असंतुलित वाढ होते. याखेरीज जेव्हा जनावरे वय वाढल्यामुळे चालण्या- फिरण्यास असमर्थ बनतात तेव्हा देखील खुरांची अमर्याद वाढ झाल्याचे दिसून येते.

**खुरे वाढल्यामुळे दिसणारी प्रमुख लक्षणे**

१. जनावर लंगडत चालते.

२. खुरांची अमर्याद वाढ झालेली असल्यास जनावर अडखळत चालते, ज्यामुळे त्याला ठोकर बसण्याची शक्यता असते. जनावरास ते आणखीनच कष्टदायक ठरते आणि मग जनावर त्याच्या त्या खूर वाढलेला असलेल्या पायाने दुमडून चालायला लागते.

३. जनावर आत्यंतिक त्रासामुळे चालण्या- फिरण्यास तयार नसते.

४. हळूहळू जनावराचा आहार कमी होऊ लागतो.

५. आहार कमी झाल्यामुळे त्याचे पर्यावसान दूध उत्पादनावर होऊन ते कमी होते.

६. जनावराच्या एकंदरीतच वाढीवर याचा परिणाम होऊन जनावर इतर आजारांना बळी पडते.

७. गायी- म्हशी योग्य वेळी माजावर येत नाहीत आणि नर प्रजनन कार्याप्रती उदासीन होत जातो.

८. हळूहळू आहार कमी झाल्यामुळे जनावरांच्या एकूणच सर्व क्रिया मंदावतात. पुढे वाढलेल्या खुरांमुळे त्या ठिकाणाहून रक्तस्राव होतो.

**उपचार** : सर्वप्रथम खूर वाढलेली जनावरे वेगळी काढावीत आणि सदर जनावरांची खुरे योग्यप्रकारे घासून, कापून योग्य आकारात रगडून घ्यावीत. असे करत असताना तज्ज्ञाची, अनुभवी गोपालकाची, पशुवैद्यकाची मदत आणि सल्ला घ्यावा. कारण खुरांची प्रमाणाबाहेरील

अतिरिक्त वाढच तासून/ कापून घ्यावी लागते. खूर वाजवीपेक्षा जास्त कापले अथवा घासले गेल्यास जनावरास अपाय होऊ शकतो.

जर खुरांच्या जागेवर जखमा झाल्या असतील आणि त्या जागेतून रक्त देखील येत असेल तर जखमा ॲन्टिसेप्टिक द्रावणाने स्वच्छ धुवून योग्य ते मलम, पावडर जखमेवर लावावी; पण हे सर्व डॉक्टरांच्या सल्ल्याने करावे.


जसे आपल्याकडे एक प्रचलित म्हण आहे की, उपचारापेक्षा अटकाव बरा. (prevention is better than cure.) त्याप्रमाणे खुरांच्या बाबतीत देखील खुरांची अतिरिक्त वाढ होऊन इतर समस्या उद्‌भवण्यापेक्षा आणि त्यावर उपचार करत बसण्यापेक्षा खुरे वाजवीपेक्षा जास्त वाढू नयेत याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**आहार हा महत्त्वाचा घटक**

सर्वात प्रथम जनावरांचा आहार हा प्रमुख घटक खूप महत्त्वाचा आहे. जनावरांना ऋतुमानाप्रमाणे त्यांच्या त्या त्या वयातील गरज लक्षात घेऊन आहाराचे व्यवस्थापन करावयास हवे. तद्‌नंतर व्यवस्थित ट्रिमिंग करून घेणे ही



खुरांसाठी तितकीच महत्त्वाची बाब आहे. वेळोवेळी खुरांना घासून घेऊन त्यांचा आकार, वाढ व्यवस्थित ठेवणे खूप गरजेचे आहे. जसे आहार व्यवस्थापन महत्त्वाचे तसेच खुरांचे व्यवस्थापन देखील महत्त्वाचे. म्हणूनच जनावरांचा आहार हा संतुलित असावा. जसे- जनावरांच्या पोटात आम्लता जास्त झालेली असेल तर ही आम्लता खुरांच्या पटलांच्या सुजेसाठी कारणीभूत ठरते.




बरेचदा असे पाहण्यात येते की, दूध देणाऱ्या गायी-म्हशींच्या आहारात चाऱ्याच्या तुलनेत खुराकातून अधिक पोषणमूल्ये पुरविली जातात. खुराकामध्ये धान्याची (मका, ज्वारी, बाजरी, गहू इ.) मात्रा अधिक असते. त्यामुळे त्यांच्या पोटात अधिक आम्ल तयार होते आणि त्यांच्या पोटातील सामू कमी करते. त्यामुळे अशा जनावरांच्या आहारात चारा आणि खुराक यांचे प्रमाण शक्यतो ६०:४० असे ठेवावे. दुधाळ जनावरांच्या पोटातील आम्लता कमी राहाणे तसेच सामू नियंत्रणात राहाण्याकरिता आहारात अधिक पोषणमूल्ये असलेली खाद्ये अर्थात हिरवा चारा आणि सुका चारा यांचे प्रमाण व्यवस्थित असावे. जास्त तंतू असलेले खाद्य जसे वाळलेले गवत आणि मुरघास रवंथ करणे वाढवते, ज्यामुळे लाळेचे प्रमाण आणि प्रवाह वाढतो आणि त्यामुळे आम्लता कमी होण्यास मदत होते. याखेरीज एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी की दूध देणाऱ्या जनावरांना ते विण्यापूर्वी २ ते ३ आठवड्यांपूर्वीपासून खुराक देण्यास सुरुवात करावी, जेणेकरून विल्यानंतर त्यांना जास्तीच्या दुग्धोत्पादनाकरिता लागणारा खुराक पचविण्याची सवय होईल. पोटात तयार होणारे आम्ल नियंत्रणात राहून पोटाचा सामू सामान्य पातळीवर राहील. तसेच आहारात ट्रेस क्षार, त्यातल्या त्यात झिंक, मँगेनीज, कोबाल्ट, कॉपर हे घटक जनावरांमधील लंगडेपणा कमी करण्यासाठी महत्त्वाचे ठरतात.

म्हणजेच खुरांच्या वाढीवर जनावरांच्या एकूणच फक्त पायांचेच नाही तर संपूर्ण आरोग्य, उत्पादन आणि प्रजनन देखील निर्भर करते. तेव्हा दैनंदिन व्यवस्थापनात जनावरांचे खूर व्यवस्थापन देखील महत्त्वाचे असते. ■